# विशेष दिवाणी दावा क्र.२१/२०२३ मधील निशाणी क्रमांक १५ वरील आदेश
## ( सौ. मनिषा माने विरुध्द अविनाश माने )
## (CNR No.MHSN050012282023)

१. प्रस्तुत अर्ज जाबदारने त्यांच्या विरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखात घेण्यात यावी याकरीता दाखल केलेला आहे.

२. जाबदार यांच्या म्हणण्यानुसार, ते शिक्षक म्हणून नोकरीस असून त्यांना सदर दाव्याच्या तारखेदिवशी नोकरीच्या ठिकाणी रजा मिळाली नाही. त्यामुळे त्यांना शाळेतील काम संपवून वेळेत कोर्टात हजर राहुन कैफियत देता आली नाही. जाबदार यांनी कैफियत देण्यास जाणूनबूजून विलंब केलेला नाही. त्यामुळे जाबदार यांना त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी न मिळाल्यास त्यांचे अपरिमित व पैशाने न भरुन येणारे नुकसान होणार असून त्यांना त्यांच्या न्यायहक्कास कायमचे मुकावे लागणार आहे. त्यामुळे जाबदार यांच्याविरुध्द झालेला 'विना कैफियत' आदेश रद्द होवून त्यांची कैफियत दाखल करुन घ्यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. अर्जदार यानी प्रस्तुत अर्जास निशाणी १६ वर म्हणणे दाखल करुन जाबदार यांच्या अर्जास ठाम विरोध दर्शविला. अर्जदारच्या म्हणण्यानुसार तिने दिनांक १७.०४.२०२३ रोजी हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम २५ प्रमाणे कायमस्वरुपी पोटगी मिळण्याकामी अर्ज दाखल केलेला आहे. जाबदार हे प्राथमिक शिक्षक म्हणून नोकरीस असून त्यांना कायदयाचे ज्ञान आहे. तरीसुध्दा आजअखेर जाबदार यांनी अर्जदार यांच्या अर्जास म्हणणे दिलेले नाही. जाबदार यांनी समन्स लागू झाल्यानंतर सुध्दा जाणूनबूजून केवळ अर्जदार यांना त्रास देण्याच्या उद्देशाने अर्जास म्हणणे दिलेले नाही. जाबदार यांचा अर्ज मंजूर झाल्यास अर्जदार यांना न्याय मिळण्यास कालावधी लागणार आहे. त्यामुळे अर्जदार यांना मानसिक, आर्थिक त्रासास सामोरे जावे लागणार आहे. करीता सदरचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व म्हणणे वाचले. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. प्रस्तुत दावा वादी अर्जदार यांनी प्रतिवादी जाबदार यांच्याकडून कायमस्वरुपी पोटगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी जाबदार यांच्या

म्हणण्यानुसार त्यांना तारखेदिवशी रजा मिळाली नसल्यामुळे कोर्टात हजर राहून कैफियत दाखल करता आली नाही. परंतु सदर विना कैफियत आदेश ९० व्या दिवशी पारीत झाला असून त्याच्या अगोदरच्या ६० दिवसांमध्ये नेमलेल्या तारखेला जाबदार पती याने त्याची कैफियत का दिली नाही याबाबत पुसटसाही उल्लेख नाही. ज्या दिवशी विना कैफियत असा आदेश पारीत झाला त्यादिवशी जाबदाराने कैफियत दाखल करण्याच्या परवानगीसह कैफियत दाखल केली या कारणामुळे मागील ६० दिवसाच्या विलंबाच्या कारणाबाबत काहीही नमूद करणे अनावश्यक आहे अशी स्थिती नाही. हे खरे आहे की, वेळोवेळी जाबदार यास संधी दिली होती. या सर्व बाबींचा विचार करता दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता दाव्यातील प्रतिवादी जाबदार यांना त्यांची कैफियत दाखल करण्याची संधी मिळणे आवश्यक आहे, त्यामुळे दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता मदतच होईल. वर नमुद केल्याप्रमाणे जाबदाराने ३० दिवसाच्या आत कैफियत का दाखल केली नाही याबरोबर ९० दिवसांपर्यंत कैफियत दाखल करण्यास काय अडचण होती याचा खुलासा न केल्याने सदर अर्ज खर्चासह मंजूर करणे आवश्यक आहे. सदर खर्चाची रक्कम म्हणजे जाबदाराला केलेली शिक्षा किंवा अर्जदाराला अन्य रितीने केलेली रोखीची मदत असा अर्थ नाही. केवळ उशीर झाल्याच्या बाबीची नोंद घेतली आहे एवढाच त्याच अर्थ आहे. वरील सर्व बाबींचा सारासार विचार करता, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रतिवादी जाबदार यांचेविरुध्द झालेला विना कैफियत आदेश खर्चाची रक्कम रुपये २५०/- अर्जदारला देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

२. प्रस्तुत प्रतिवादी जाबदार यांनी पुढील तारखेपर्यंत खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर सदर कैफियत अभिलेखावर दाखल करुन घेण्यात येईल. जाबदार यांनी पुर्तता न केल्यास आदेश निरस्त करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MUKUL MADHUSUDAN CHITALE
Date: 2024.11.29 13:25:23 +0530

**इस्लामपूर.** **(मुकुल म. चितळे)**

**दिनांक -२८.११.२०२४** **दुसरे सह-दिवाणी न्यायाधीश व. स्तर, इस्लामपूर.**

**<u>प्र मा ण प त्र</u>**

मी खात्रीपुर्वक सांगतो की, सदरहु पी. डी. एफ. फाईलमधील सर्व मजकूर मुळ आदेशाप्रमाणे शब्द नि शब्द बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | - | सतिश कृष्णा पाटील, |
| कोर्टाचे नाव | - | दुसरे सह दिवाणी न्यायालय व. स्तर, इस्लामपूर. |
| आदेश घोषीत दिनांक | - | **२८.११.२०२४** |
| पी.डी.एफ/अपलोडचा दिनांक- | | **२९.११.२०२४** |